


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१० सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056




# दिवाळी, छटपूजेसाठी पुण्याहून धावणार ३०० विशेष गाड्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, पुणे :** दिवाळी व छटपूजा या सणाच्या पार्श्वभूमीवर होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने ९४४ विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामध्ये पुण्याहून राज्यातील लातूर आणि नागपूर या शहरांसह उत्तर भारतामधील शहरांसाठी विशेष ३०० गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी म हाराष्ट्रातील लातूर आणि नागपूर या शहरांसाठी ९४ विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत.



**लातूर–हडपसर–लातूर विशेष**
**(७४ फेऱ्या–२६ सप्टेंबर ते २८ नोव्हेंबर)**

गाडी सुटणारे दिवस – सोमवार, मंगळवार, बुधवार व शुक्रवार

गाडी क्रमांक ०१४२९ – लातूर येथून सकाळी ९.३० वाजता गाडी क्रमांक ०१४३० – हडपसर येथून दुपारी ४.०५ वाजता

**थांबे** – दौंड जंक्शन, जेऊर, कुडूवाडी, बार्शी टाउन, धाराशिव, मुरुड, हरंगुळ, लातूर

**पुणे–हजरत निजामुद्दीन – पुणे साप्ताहिक सुपरफास्ट (२० फेऱ्या–२६ सप्टेंबर ते २८ नोव्हेंबर)**

गाडी क्रमांक ०१४९१: पुणे येथून दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजता

गाडी क्रमांक ०१४९२ : निजामुद्दीन येथून दर शनिवारी रात्री ९.२५ वाजता

**थांबे** : लोणावळा, कल्याण, भिवंडी रोड, वसई रोड, वलसाड, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपुर, गंगापूर सिटी, भरतपूर, मथुरा

**पुणे–सांगानेर–पुणे साप्ताहिक सुपरफास्ट**
**(२० फेऱ्या–२४ सप्टेंबर ते २६ नोव्हेंबर)**

गाडी क्रमांक ०१४३३ : पुणे येथून दर बुधवारी सकाळी ९.४५ वाजता

गाडी क्रमांक ०१४३४ : सांगानेर येथून दर गुरुवारी सकाळी ११.३५ वाजता

**थांबे** : लोणावळा, कल्याण, भिवंडी रोड, वसई रोड, वलसाड, वडोदरा, रतलाम, कोटा, सवाई माधोपूर

**पुणे– गोरखपूर–पुणे विशेष (१३० फेऱ्या–२७ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर)**

गाडी क्रमांक ०१४१५ : पुणे येथून दररोज सकाळी ६.५० वाजता

गाडी क्रमांक ०१४१६ : गोरखपूर येथून दररोज संध्याकाळी ५.३० वाजता

**थांबे** : दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, इटारसी, भोपाळ, झाशी, कानपूर, लखनौ, गोंडा, बस्ती

**पुणे–नागपूर–पुणे साप्ताहिक विशेष**
**(२० फेऱ्या–२७ सप्टेंबर ते २९ नोव्हेंबर)**

गाडी क्रमांक ०१२०९ : नागपूर येथून दर शनिवारी रात्री ७.४० वाजता

गाडी क्रमांक ०१२१०: पुणे येथून दर रविवारी दुपारी ३.५० वाजता

**थांबे** : दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, अकोला, वर्धा

**पुणे–दानापूर–पुणे विशेष**
**(१३४ फेऱ्या–२५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर)**

गाडी क्रमांक ०१४४९ : पुणे येथून दररोज दुपारी ३.३० वाजता

गाडी क्रमांक ०१४५० : दानापूर येथून सकाळी ५.३० वाजता

**थांबे** : दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, इटारसी, जबलपूर, प्रयागराज, पं. दीनदयाळ उपाध्याय जंक्शन

## वाचक पत्र

### यंदाही उंच गणेश मुर्त्या समुद्र किनाऱ्यावरच !

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी गिरगाव चौपाटीच्या किनाऱ्यावर कितीतरी उंच गणेशमूर्त्या विसर्जनाविना उभ्या होत्या तर कितीतरी मुर्त्या किनाऱ्यावर कोसळून छिन्न विच्छिन्न अवस्थेत पडलेल्या होत्या. ज्या श्री गणेशाला दहा दिवस मनोभावे पुजले जाते, त्याच्या चरणी नवस केले जातात, त्याच्या आगम नासाठी सुंदर सजावट केली जाते, वाजत गाजत त्याची मिरवणूक काढली जाते अशा गणेश मूर्तींची झालेली अवहेलना पाहून मनाला वेदना होतात. उंच मुर्त्यांचे दर्शन घेण्यासाठी देश विदेशातून लाखो भाविक दरवर्षी मुंबईत येत असतात. मात्र याच उंच मुर्त्या दुसऱ्या दिवशी समुद्राच्या किनारी पाहिल्यावर गणेश मूर्ती ही शोभेची आणि प्रदर्शनाची वस्तू बनू लागली आहे का असा प्रश्न पडतो. यंदा भरती ओहोटीच्या अंदाज चुकल्याने दरवर्षी सकाळी १० वाजेपर्यंत होणारे लालबागच्या राजाचे विसर्जन यंदा १० तास लांबले तरीही लालबागच्या राजा मंडळाने बाप्पाचे नेहमीप्रमाणेच साजेसे विसर्जन केले. मग उंच मुर्त्या आणणारे या मुर्त्यांचे खोल समुद्रात विसर्जन का करत नाहीत. मंडळाकडे तेव्हढे कार्यकर्ते नाहीत, किंवा भांडवल नाही तर ही मंडळे उंच मुर्त्या तरी का आणतात ? अनंत चतुर्दशीला अनेक मंडळे बाप्पाच्या चरणाला पाणी लागले की तेथून पळ काढतात. भरती सरल्यावर या उंच मुर्त्या किनाऱ्यावर उभ्या असलेल्या पाहायला मिळतात. अशा मूर्त्यांना मग क्रेनच्या आधारे खाली पाडून त्यांना भग्न करावे लागते. ज्या गणेशाच्या नावाने १० दिवस उत्सव साजरा केला जातो त्याचा केव्हढा हा अवमान. गणेशोत्सव हा मौजेचा नव्हे तर श्रद्धेचा उत्सव आहे; मात्र हल्ली आपल्या मंडळाची मूर्ती किती उंच आहे हे दाखवण्याची स्पर्धा मंडळांमध्ये रंगताना पाहायला मिळते ज्यामध्ये श्रद्धेला सोयीस्करपणे तिलांजली दिली जाते. उंच गणेशमूर्त्या किनाऱ्यावर सोडून पळ काढणाऱ्या, त्यांचे योग्य पद्धतीने विसर्जन न करणाऱ्या मंडळांवर खरेतर कारवाई करून त्यांना पुढील वर्षी उंच मूर्ती आणण्यास प्रतिबंध घातला पाहिजे.

**– सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

# सटाण्यात बस-दुचाकीचा भीषण अपघात; दोन सख्ख्या भावांसह एकाचा जागीच मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, सटाणा :** सटाणा–ताहाराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वनोली फाट्याजवळ राज्य परिवहन महामंडळाची बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघा सख्ख्या भावांसह एकाचा जागीच मृत्यू झाला. दुचाकीवरील तिघे मजुरीच्या काम ासाठी निघाले असताना ही दुर्घटना घडली.



सोमवारी (दि. ८) रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास वसई आगाराची बस (क्र. एमएच १४, एलएक्स ८८४९) नंदुरबारहून वसईला निघाली होती. ती ताहाराबादकडून सटाण्याच्या दिशेने येत असतानाच वीरगावजवळ विनंती थांब्यानजीक समोरून वेगात आलेली दुचाकी (क्र. एमएच ४१, बीएस ४१२४) बसवर आदळली. यात दुचाकीवरील गोविंद काळू पवार (५०), विकास उर्फ विकी दयाराम म ाळी (१९ )आणि रोशन दयाराम माळी (२०) यांचा जागीच मृत्यू झाला.

सटाणा येथील ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात येऊन दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. बसचालक मारुती साठे (रा. वसई ) याला पोलिसांनी ताब्यात घेतले. विकास व रोशन हे दोघे सख्खे भाऊ दगावल्याने त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात झाला आहे.

**समृद्धीवर कार जळून खाक...**

मुंबई–नागपूर समृद्धी महामार्गावर दुशिंगवाडी शिवारात अचानक लागलेल्या आगीत कार जळून खाक झाल्याची घटना सोमवारी (दि.८) सकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली धूर निघत असल्याचे लक्षात आल्यानंतर चालकाने तातडीने रस्त्याच्या कडेला कार उभी करत दोघेजण बाहेर पडल्याने दोघेही या घटनेतून सुखरूप बचावले.

**दुचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू...**

चांदवड तालुक्यातील शिंगवे शिवारात दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने वसंत दत्तात्रय बागूल (वय ६५, रा. आहेरखेडे, चांदवड) यांचा मृत्यू झाला. तेजस वसंत बागूल (वय २५) हा वडील वसंत बागूल यांना घेऊन मनमाड येथे रुग्णालयात जात असताना मनमाडजवळील लासलगाव बाजूकडे रस्ता ओलडण्यासाठी थांबले असता पाठीमागून आलेल्या दुचाकीवरील (क्र. एमएच ४१ एके १२९५) अज्ञात चालकाने धडक दिल्याने वसंत बागूल यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

अज्ञात दुचाकीचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास चांदवड पोलिस करीत आहेत.

# उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत राधाकृष्णन यांचा मोठा विजय !!



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, नवी दिल्ली :** गेल्या अनेक दिवसांपासून उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीची चर्चा होती. या निवडणुकीत बहुमत नसतानाही इंडिया आघाडीने आपला उमेदवार उभा केला होता. ही फक्त विजयाची नव्हे तर विचारधारेची लढाई आहे, असे यावेळी विरोधकांकडून सांगण्यात आले होते. दरम्यान, या निवडणुकीसाठी आज (९ सप्टेंबर) मतदानाची प्रक्रिया पार पडली. तसेच या निवडणुकीचा निकालही आजच जाहीर करण्यात आला. या निवकालानुसार ही निवडणूक एनडीएने जिंकली असून सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल असलेले सीपी राधाकृष्णन यांची देशाचे नवे उपराष्ट्रपती म्हणून घोषणा करण्यात आली आहे.

**कोणाला किती मतं पडली?**

राज्यसभा आणि लोकसभेच्या खासदारांनी या निवडणुकीसाठी मतदान केल्यानंतर लगेच मतमोजणी करण्यात आली. यावेळी मतमोजणीनुसार सीपी राधाकृष्णन यांना एकूण ४५२ पहिल्या पसंतीची मतं मिळाली आहेत. तर दुसरीकडे इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांना एकूण ३०० पहिल्या पसंतीची मतं मिळाली आहेत. उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी एकूण ७६८ खासदारांनी मतदान केले होते.

# वरळी सी-लिंकवर भीषण अपघात! पोलीस हवालदाराचा मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** मंगळवारी सकाळी दक्षिण मुंबईतील वरळी सी–लिंकवर भीषण अपघात झाला आहे. हा अपघात वरळी सी–लिंकच्या कनेक्टिंग पॉइंडजवळ झाला आहे. रस्त्यावरील भरधाव वेगात जाणाऱ्या गाडीने पोलीस हवालदाराला उडवले. या हवालदाराला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तसेच महिला पोलीस कर्मचारी देखील गंभीर जखमी झाली आहे. कार चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, वरळी सी–लिंकच्या कनेक्टिंग पॉइंटजवळ काही व्हीआयपी बंदोबस्तासाठी पोलीस तैनात करण्यात आले होते. त्यामधील पोलीस हवालदार दत्तात्रय कुंभार यांना भरधाव वेगात जाणाऱ्या गाडीने उडवले. ते वरळी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यानंतर त्यांना वोक्हार्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. पण त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच महिला पोलीस कर्मचारी देखील गंभीर जखमी झाली आहे. कार चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# शिक्षकाचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी : आमदार सुधाकर अडबाले

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** शिक्षक हा समाज घडवणारा शिल्पकार आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य लक्षवेधी आहे. नव्या पिढीला दिशा देण्यासाठी सातत्याने शिक्षक झटत असतो. त्यामुळे शिक्षक सेवानिवृत्त झाला तरी कधीही माजी होत नाही. तो आजीवन शिक्षकच असतो. त्यामुळे समाज घडवणाऱ्या शिक्षकांचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन आमदार सुधाकर अडबाले यांनी केले. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, चंद्रपूर यांच्या वतीने व गोविंद मैना फाऊंडेशन चंद्रपूरच्या सौजन्याने शिक्षकदिनानिमित्त जिल्हा आदर्श शिक्षक सन्मान सोहळा २०२५ धनोजे कुणबी सभागृह चंद्रपूर येथे रविवारी पार पडला. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून आ. अडबाले मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी आमदार व्ही. यु. डायगव्हाणे होते तर प्रमुख म ार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. दिलीप चौधरी यांची उपस्थिती होती. तसेच प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) राजेश पातळे, गोविंद मैना फाउंडेशनचे अध्यक्ष सीमा अडबाले, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सदस्य लक्ष्म णराव धोबे, प्रवीण नाकाडे, प्राचार्य डॉ. अनिल शिंदे, विदर्भ



माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, वर्धा जिल्ह्याचे कार्यवाह महेंद्र सालंकार, प्रा. डॉ. संजय गोरे, प्रा. डॉ. प्रवीण जोगी, अरविंद राऊत, विनोद पिसे, प्रा डॉ. प्रवीण चटप, प्रा. प्रमोद उरकुडे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ चंद्रपूर जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगरचे अध्यक्ष दिगंबर कुरेकर, कार्यवाह सुरेंद्र अडबाले, यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात प्रा. डॉ. दिलीप चौधरी यांनी नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षकांची भूमिका, आव्हाने व शिक्षण क्षेत्रातील घडणारे बदल यावर सविस्तर मार्गदर्शन केले. भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी पुरेसे संसाधने, सुविधा अजूनही उपलब्ध नाहीत. हजारो जागा शिक्षकांच्या रिक्त आहेत. अशा परिस्थितीमध्ये नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंम लबजावणी कशी होणार? मराठी माध्यमांच्या शाळा उध्वस्त होत आहेत. ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था उध्वस्त होत आहे. उद्घाटनीय मनोगतात माजी आमदार डायगव्हाणे यांनी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले व सम ाजामध्ये आपली जबाबदारी वाढलेली आहे. त्यामुळे घरात आणि घराबाहेर सुद्धा आपले कर्तृत्व हे आदर्श असले पाहिजे याची जाणीव ठेवावी, असे प्रतिपादन केले. तसेच विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या कर्तृत्वामुळे व नेतृत्वामुळेच आज शिक्षकांना सन्मानाचे स्थान त्यांचे अधिकार मिळाले आहेत.

या सोहळ्यात जिल्ह्यातील १५ तालुक्यांम धून निवड करण्यात आलेल्या उत्कृष्ट १५ शिक्षकांचा, तसेच उत्कृष्ट संस्था, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट मुख्याध्यापक, आदिवासी, विजाभज, कॉन्व्हेंट विभागातील उत्कृष्ट शिक्षक व उत्कृष्ट पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. एकूण ३५ मान्यवरांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र, भेटवस्तू देऊन सपत्निक सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रभाकर पारखी यांनी केले. संचालन आनंद चलाख व रूपाली मुंगल यांनी केले. आभार प्रदर्शन महानगरचे कार्यवाह सुरेंद्र अडबाले यांनी मानले.




## दिल्लीत गणपती बाप्पा मोरया...

देशाची राजधानी दिल्लीसह राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील (एनसीआर) गुरुग्राम, नोएडा, गाझियाबाद, कोशांबी आदी शहरांतील अनेक रस्ते आज अनंत चतुर्दशीनिमित्त गणेश विसर्जन मिरवणुकींनी गजबजतील. दिल्लीत यंदा नदीची पाणीपातळी चांगलीच वाढल्याने यमुनाकाठावर सरसकट विसर्जनास परवानगी मिळण्याबाबत शंका असली तरी गणेशभक्तांच्या उत्साहात खंड नाही. सत्तेच्या सारीपाटाचा खेळ चोवीस तास रंगलेला असतो अशा दिल्लीत दिवाळी व होळीसह गणेशोत्सव, दुर्गापूजा, ओणम, नवरात्रीतल्या रामलीला आदींच्या काळात त्या सत्ता-रंगांच्याही छटा बदलल्याचे भासते! १९५०च्या दशकापासून दिल्लीतील महाराष्ट्र मंडळ व मराठी जनांच्या संघटनांनी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करणे सुरू केले असले तरी अलीकडे सार्वजनिक गणेशोत्सव दिल्लीत जाणवण्याइतपत जोरदार साजरा होऊ लागला आहे. त्याचे बहुभाषिक आणि बहुधार्मिक स्वरूपही मोहक असते.

मराठी मातीची देशाला देणगी असलेल्या अशा या उत्सवाच्या निमित्ताने दिल्लीत ठिकठिकाणचे हिंदी बांधवही, 'संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना' ही गणपतीची आरती जोरात म्हणतात. त्या क्षणी हिंदी-मराठीच्या तद्दन राजकीय वादांचा राजधानीत होणारा पराभव पाहणे सुखद असते! कार्यकर्त्यांच्या घोषणा व आरत्यांनी भारलेले वातावरण एकीकडे आणि राजकीय नेत्यांभोवतीचे कॅमेरे, वाद, सत्ता, संघर्ष, सौदेबाजी, भाषणे, आंदोलने, निवडणुका, राजकीय समीकरणांची सापशिडी आणि जनसंपर्काच्या नावाखाली स्वतःची छबी उजळविण्याचा खेळ दुसरीकडे अशा वातावरणात दिल्लीत दणक्यात गणेशोत्सव होतो. गणेशोत्सवाच्या निमित्ताने जमून राजकीय चर्चा, समीकरणे, आणि नेटवर्किंगही रंगते यात आश्चर्य नाही.

राजधानीत गेल्या दोन-अडीच दशकांत गणेशोत्सव ठिकठिकाणी विलक्षण दणक्यात साजरा होऊ लागला आहे. अगदी काही अमराठी राजकीय नेत्यांच्या निवासस्थानीच नव्हे तर जागोजागची उद्याने, मोकळी मैदाने, पदपथ, पक्षकार्यालये इतकेच काय अलीकडे अनेक पोलिस ठाण्यांतही गणरायांची प्रतिष्ठापना केली जाते! दिल्लीतील नोंदणीकृत गणेशोत्सव मंडळांची संख्या ६०च्या पुढे गेली आहे. राजकारणी मंडळींच्या गणेशोत्सवात अनेकदा श्रद्धेइतकाच मोठा ठरतो तो जनसंपर्क. एके काळी दिल्लीतला गणेशोत्सव काही मर्यादित मराठी मंडळे व कुटुंबे यांच्यापुरता मर्यादित होता. पण आता हा बहुसांस्कृतिक उत्सव झाला आहे. दिवंगत सुषमा स्वराज वा शीला दीक्षित असोत, अरविंद केजरीवाल व आतिशी असोत, की सध्याच्या रेखा गुप्ता, दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना, त्यांच्या मंत्र्यांनाही टाळता न येणारा असा हा उत्सव झाला आहे.

पारंपरिकरीत्या सार्वजनिक उत्सव समिती, करोल बाग, पहाडगंज, जनकपुरी, महाराष्ट्र सदन, आनंदवन-सह्याद्रीसारख्या मराठी भाषक सोसायट्या आदी ठिकाणचा दिल्ली गणेशोत्सव प्रसिद्ध आहेच; पण आता त्याची व्याप्ती चाणक्यपुरी, साऊथ एक्स्टेंशन, द्वारका, खान मार्केट, काली बाडी, खासदार निवासस्थानांच्या परिसरातील कर्मचाऱ्यांपासून लक्ष्मीनगर, पटपडगंज, मयूर विहार, रोहिणी, साकेत अशा उपनगरांपर्यंत वाढली आहे. करोलबागेपासून मोतिया खानपर्यंतच्या परिसरात गणेशोत्सव दणक्यात साजऱ्या करणाऱ्यांपैकी एक व दिल्लीतील एकमेव निर्वाचित मराठी लोकप्रतिनिधी पुष्पा वसंतराव काळे यांनी तर आणीबाणीत अंबाला तुरुंगातही गणपती बसवण्याचा आग्रह तेव्हाच्या जेलरकडे धरला होता. तो नाकारल्यावर मग आपण तुरुंगातच मोदकाचा नेवैद्यही केल्याची आठवण काळे आजींच्या मनात ताजी आहे!

भारताच्या राजकीय राजधानीतील गणेशोत्सव भक्तिरंगासोबत राजकीय रंगात देखील रंगून आला नाही, तरच नवल म्हणावे लागेल. भाजपचे दिग्गज नेते दिवंगत अरुण जेटली हे गणेशोत्सव करत, त्याला अगदी अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहा यांच्यापर्यंतचे भाजपचे दिग्गज हजेरी लावत असत. मराठी नेत्यांपैकी वसंत साठे यांच्याकडे गणेशोत्सव होत असे. दिल्लीतील सत्तेतील सारे राजकीय तारामंडळ त्यांच्याकडे त्यानिमित्ताने जमत असे. नंतरच्या काळात प्रकाश जावडेकर, विनय सहस्रबुद्धे हेही गणेशोत्सवानिमित्त कार्यक्रम करत. गेली काही वर्षे सुनील देवधर नॉर्थ ॲव्हेन्यूतील निवासस्थानी जोरदार गणेशोत्सव साजरा करतात. तेथे समाजाच्या विविध वर्गांतील लोकांच्या हस्ते रोजची आरती करण्याचा परिपाठ त्यांनी सुरू केला आहे. देवधर यांच्याकडील गणपतीत दिव्यांगांपासून सफाई कर्मचारी, कधी अल्पसंख्याक, कधी तृतीयपंथी आदींच्या हस्ते आरती होते. तर, महाराष्ट्र सदनातील गणपतीला हजारोंची गर्दी ठरलेली असते.

# जातीजातीमध्ये विभागलेला ओबीसी समाज...

**जातीजातीमध्ये विभागलेला ओबीसी समाज**
**सर्व समावेशक नेतृत्वाच्या प्रतीक्षेत..**
**प्रबळ असूनही ओबीसी**
**स्वतःची ताकद दाखवूशकलेला नाही...**
**चला एक होऊया...**
**चला एकत्र लढूया...**
**एकत्र जिंकूया....**

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठी समाजाच्यादबावाला बळी पडून महाराष्ट्र शासनाने हैदराबाद गॅजेटचा आधार घेत कुणबी नोंदी संदर्भात जीआर काढला आणि मराठी आंदोलनातून स्वतःची एकदाची सुटका करून घेतली. या शासकीय जीआर ला ओबीसी समाजाकडून विरोध होईल हे अपेक्षित होते. पण तो इतक्या तात्काळ व तीव्रपणे होईल असे अपेक्षित नव्हते. प्रा. लक्ष्मण हाके व आडवोकेट ससाने यांनी निश्चित शासनाला नोंद घ्यावी लागेल अशा प्रकारचे मोर्चे व सभा आयोजित करून आंदोलनातील स्वतःचे नाव अधोरेखित केले. शासनाला या आंदोलनाची नोंद घ्यावीच लागली. नागपूरला सुरू असलेले तायवाड्याच्या नेतृत्वाखालील साखळी उपोषण किंवा भुजबळ साहेबांची मुंबईत घेतलेली पत्रकार परिषद याला प्रतिउत्तर म्हणून शासनाने ओबीसी समाज अभ्यास उपसमिती स्थापन करून याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये त्यांनी माननीय चंद्रशेखर बावनकुळे यांना या उपसमितीचे अध्यक्ष करून एक ओबीसी ओबीसी चे पुढे उभा केला. ओबीसी समाजाच्या एका नेत्याच्या अध्यक्षतेखाली असलेली ओबीसी अभ्यास समिती ओबीसी समाजाला किती न्याय देते हे भविष्यकाळच सांगेल.

या समितीमध्ये... माननीय चंद्रशेखर बावनकुळे, अध्यक्ष सदस्य.... माननीय छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, दत्तात्रय भरणे, अतुल सावे हे सदस्य म्हणून घेण्यात आलेले आहेत.

ही उपसमिती खालील उद्दिष्टांसाठी स्थापन करण्यात आली आहे.

**१-** ओबीसी आरक्षणाचे संरक्षण.. मराठा समाजाला ओबीसी मध्ये घेण्याच्या प्रयत्नामुळे मूळ ओबीसी वरती अन्याय होत आहे का याचा अभ्यास करणे.

**२-** धोरणात्मक शिफारशी.. ओबीसी समाजाच्या आर्थिक शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी ध्येयधोरणे निश्चित करणे व शासनाला तशा शिफारशी करणे.

**३-** अहवाल सादर करणे... समितीने शासनाला वेळोवेळी अहवाल सादर करून या ध्येयधोरणामध्ये करावयाचे बदल सुचित करणे.

४- आंदोलनाला उत्तर देणे.. ओबीसी समाजाच्या आंदोलनाला सकारात्मक प्रतिसाद देऊन त्यांचा विश्वास संपादन करणे व सरकारला ज्ञात करणे.

**५-** विकासाचे कार्यक्रम आखणे.. ओबीसी वस्तीग्रह शिष्यवृत्ती महिला विकास व इतर ओबीसीसाठीच्या योजनांमध्ये अभ्यास करणे व बदल सुचविणे.

या आणि अशा ओबीसी समाजाशी संलग्न असणाऱ्या विषयावरती अभ्यास करून शासनाला वेळोवेळी सूचित करण्याचे काम या उपसमितीकडे देण्यात आलेले आहे. या उप समितीची पहिली बैठक १० सप्टेंबर २०२५ ला नियोजित असून या उपसमितीने कायदेशीर सल्लागाराकडून सल्ले घेऊन शासनाने काढलेल्या जीआर मुळे ओबीसी समाजावर आरक्षणाबाबत काही अन्याय होतो का?याचाही अभ्यास करणेचे समाविष्ट आहे. याचा अर्थ ओबीसी समाजाकडून सध्या होत असलेली आंदोलने व सभा याची तीव्रता कशी कमी करता येईल. हा ही शासनाचा यामागचा उद्देश दिसून येत आहे.

**ओबीसी आरक्षण भाग : ०५**

ओबीसी समाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये जाती-जातीमध्ये विभागलेला आहे. आज ३७३ जाती एकत्र करणे, एकत्र आणणे, त्यांना एकसंघपणे बांधणे व लढ्यासाठी उभे करणे हे इतके सोपे व सहज काम नाही. पण तरीही ओबीसी बांधवाला याची जाणीव आहे. आज आमच्या हक्कावर अतिक्रमण होत आहे. आम्हाला उभे राहिलेच पाहिजे. आम्हाला लढा दिलाच पाहिजे. आज नाहीतर कधीच नाही ही जाणीव प्रत्येक ओबीसीच्या मध्ये आहे. पण हा लढा द्यायचा कसा? हा लढा लढायचा कसा? या साठी सर्व समावेशक नेतृत्व करणारा नेता ओ बी सी कडे नाही ही मोठी कमतरता आहे. याचा अत्यंत गांभीर्याने विचार करण्याची वेळ ओबीसी बांधवांवरती आलेली आहे हे विसरू नका. आज विभागा विभागामध्ये नेतृत्व करणाऱ्या ओबीसी नेत्यांनी याचा गांभीरपणे विचार केला पाहिजे. एका समान पातळीवर एका समान कार्यक्रमांतर्गत सर्वांनी एकत्र येणे ही आजची आवश्यकता आहे.

आज ओबीसी समाजाचे ढोबळमानाने संख्याबळ विचारात घेतले तरी तुम्ही ५२% च्या जवळपास असूनही वरच्या दोन टक्क्याची ही एकी दाखवू शकलेलो नाही. त्यामुळे संख्याबळाने कमी असलेला समाज तुमच्यावरती वर्षं वर्षो अधिकार गाजवत आहे. आज मराठा समाजाने एकजुटीचा हिसका दाखवून तुमच्या आरक्षणावरती हल्ला केलेला आहे. याला प्रतिकार फक्त आणि फक्त तुमची एकजूट करू शकते हे निर्विवाद सत्य आहे. हे जरी सत्य असले तरी तुमच्यातल्या काही कमतरता तुमच्या यशाला मारक ठरु नयेत, याची गांभीर्याने नोंद आंदोलक नेत्यानी घ्यायलाच हवी. आज ओबीसी समाजाचे आरक्षण वाचवण्यासाठी,

करायच्या आंदोलनाच्या संदर्भात सप्टेंबर मध्ये एक बैठक व नागपूर मध्ये ऑक्टोबर मध्ये नियोजनासाठी बैठक घेण्याचे वाचनात आले व निश्चितच आनंद झाला. आज ओबीसींचे सर्व गट एकत्र येऊन याबाबतचे नियोजन होणे गरजेचे आहे. व हे होत आहे ही अभिनंदनीय बाब आहे.आज सर्वजण वेगवेगळे लढत असले तरी या सर्वांचा उद्देश मात्र एक आहे. आज विखुरणारी ताकद एकत्र आल्यास महासागर निर्माण होईल व तो शासनाला थोपवणे शक्य होणार नाही. तुमच्या मागण्याच नव्हे त्याहीपेक्षा अधिक तुमच्या वाट्याला येणे इतकी तुमची ताकद आणि संख्याबळ आहे, याची जाणीव फक्त होणे गरजेचे आहे.

आज ग्रामीण भागामध्ये अनेक जाती-जातींच्या संस्था व संघटना कार्यरत आहेत. या सर्वांना एकत्र घेऊन गाव पातळी ते वरिष्ठ पातळीपर्यंत एकसंघता आणणे हीच खरे गरज आहे. आज श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र ही संस्था ओबीसी च्या आंदोलन मधला आपला वाटा उचलत आहे. सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यामध्ये ओबीसी समाजाला जागा करून त्या प्रत्येक विभागातील तहसीलदार यांना आमचे आरक्षण वाचवण्यासंदर्भात निवेदन देण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. अशा अनेक संस्था आणि संघटना वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत आहेत. ज्या योग्य मार्गदर्शनाची आणि वरिष्ठ पातळीवरून आदेशाची वाट पाहत आहेत.

**चला एकत्र येऊया...**
**एकत्र लढूया...**
**एक ताकद निर्माण करूया...**

आमचे आरक्षण वाचविणे हे आमचे एकमेव ध्येय आहे. ते ध्येय साध्य करताना निश्चित अडचणी येतील. पण त्यावरती आमची एकता, एकसंघता, मात करेल. आम्ही त्यात निश्चित यशस्वी होऊ. यात तिळमात्र शंका नाही.

**जय ओ बी सी..**

**आपला**
**राम पडगे**
**अध्यक्ष श्री संताजी शैक्षणिक व**
**सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र.**

# टी २० चा रणसंग्राम !

कालपासून (९ सप्टेंबर) आखातातील दुबई आणि अबुधाबी येथे टी २० क्रिकेटचा रणसंग्राम सुरू झाला आहे. आशिया खंडातील क्रिकेटचा राजा कोण हे ठरवण्यासाठी भारतासह आशिया खंडातील आठ देश एकमेकांना भिडणार आहेत. या स्पर्धेत जो संघ विजयी होईल तो आशिया चषकावर स्वतः चे नाव कोरणार आहे. आशिया खंडातील भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि पात्रता फेरीत विजय मिळवून मुख्य स्पर्धेसाठी पात्र ठरलेले हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि ओमान या आठ संघात ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेतील पहिला सामना काल अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात झाला तर आज भारत आणि संयुक्त अरब अमिराती (युएई) यांच्यात लढत रंगणार आहे. वास्तविक आशिया चषकाची पात्रता फेरी याआधीच सुरू झाली असून या पात्रता फेरीत हाँगकाँग, संयुक्त अरब अमिराती (युएई) आणि ओमान हे संघ पात्र ठरले असून भारत, पाकिस्तान यांच्या गटात संयुक्त अरब अमिराती (युएई ) आणि ओमान हे देश समाविष्ट झाले आहेत. दुसऱ्या गटात श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग हे देश आहेत. प्रत्येक गटातून दोन संघ असे एकूण चार संघ सुपर फोरसाठी पात्र ठरतील त्यांच्यात पुन्हा लढत होऊन दोन संघ अंतिम फेरीत पोहचतील. या स्पर्धेत आठ संघ खेळत असले तरी भारत आणि पाकिस्तान या दोन संघांना विजेतेपदासाठी पसंती दिली जात आहे. भारत आणि पाकिस्तान हे या स्पर्धेत प्रबळ दावेदार मानले जात असले तरी तरी श्रीलंका, बांगलादेश आणि अफगाणिस्तान हे संघही चांगली तयारी करुन मैदानात उतरले आहेत त्यामुळे ही स्पर्धा रंगतदार ठरेल यात शंका नाही. भारतासाठी ही स्पर्धा विशेष महत्वाची आहे कारण मागील तीन पैकी दोन स्पर्धेत (२०१६ , २०१८, २०२३) भारताने विजेतेपद मिळवले आहे. २०२२ साली श्रीलंकेने आशिया चषकावर नाव कोरले होते. भारताने ही स्पर्धा सर्वाधिक आठ वेळा जिंकली असून यावेळी ही स्पर्धा जिंकून भारत आशिया चषकावर नवव्यांदा नाव कोरेल का ? याकडे क्रिकेट प्रेमींचे लक्ष लागले आहे. भारतीय संघ या स्पर्धेत हॉट फेव्हरेट समजला जातोय कारण भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात संतुलित संघ आहे. भारताचे सर्व खेळाडू अनुभवी असून फॉर्मात आहेत. डावखुरा युवा धडाकेबाज फलंदाज अभिषेक शर्मा आणि अनुभवी स्टायलिश फलंदाज शुभमन गिल यांची सलामीची जोडी प्रतिस्पर्धी गोलंदाजांवर तुटून पडली की मधल्या फेरीचे काम हलके होऊ शकते. तिसऱ्या क्रमांकावर युवा डावखुरा फलंदाज तिलक वर्मा येईल तो सध्या बॅडपॅच मधून जात असला तरी त्याची बॅट कधीही




तळपू शकेल. तिलक वर्मा जर फॉर्मात आला तर भारताला या स्पर्धेत विजेतेपद मिळवण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. चौथ्या क्रमांकावर कर्णधार सुर्यकुमार यादव येईल तो ही सध्या चांगलाच फॉर्मात असून एकहाती सामना जिंकून देण्यात तो पटाईत आहे. त्याच्यानंतर विकेट किपर आणि स्फोटक फलंदाज संजू सॅमसन येईल. ज्या


**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

दिवशी संजू सॅमसनची बॅट चालते त्यादिवशी भारत विजयी होतो. त्यानंतर रिंकू सिंग किंवा शिवम दुबे येतील ते फिनिशरची भूमिका निभावतील. कदाचित जितेश शर्मा यालाही या क्रमांकावर संधी मिळू शकते तो ही चांगला फिनिशर आहे. त्यानंतर अनुभवी हार्दिक पांड्या हा फलंदाजीस येईल. हार्दिक पांड्या हा अनुभवी अष्टपैलू खेळाडू संघात असल्याने संघाचे संतुलन वाढले आहे. वेगवान गोलंदाजीची धुरा अनुभवी जसप्रीत बुमरा आणि युवा अर्षदीप सिंग तसेच हर्षित राणा सांभाळतील तर फिरकी गोलंदाजीची धुरा अनुभवी अक्षर पटेल आणि कुलदीप यादव यांच्यावर आहे. त्यांना मिस्ट्री फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीची साथ लाभेल. वरुण चक्रवर्ती हा जगातील सध्याचा सर्वात घातक फिरकी गोलंदाज समजला जातो. त्याची फिरकी भल्या भल्या फलंदाजांनाही कळत नाही त्याचा दिवस असला तर प्रतिस्पर्धी फलंदाजांची फळी कोलमडून पडेल. अक्षर पटेल हा फिरकी गोलंदाज फलंदाजीही करतो. म्हणजे तो ही अष्टपैलू खेळाडू आहे. संघात निवड झालेले हे सर्व खेळाडू टी २० मधील जाणकार खेळाडू आहेत विशेष म्हणजे या खेळाडूंना दुबई आणि अबुधाबीमध्ये खेळण्याचा चांगला अनुभव आहे. दुबई आणि अबुधाबी मध्ये भारतीय संघ अनेक आंतरराष्ट्रीय सामने खेळला आहे. याच ठिकाणी एकदा आयपीएलही रंगली होती आणि त्यात यातील काही खेळाडूंनी भाग घेतला होता त्यामुळे तेथील खेळपट्टी आणि हवामानाशी भारतीय खेळाडू परिचित आहेत. त्यामुळे भारतच या स्पर्धेचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. भारताला या स्पर्धेत जर कोणी आव्हान देऊ शकेल तर तो पाकिस्तान. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १४ सप्टेंबर रोजी लढत होणार असून या लढतीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. नेहमीप्रमाणे भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये होणारा हा सामना रंगतदार होईल यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर नंतर पहिल्यांदाच हे दोन्ही संघ आमने सामने येत असल्याने या सामन्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. अलीकडच्या काळात पाकिस्तानची कामगिरी चांगली झालेली नाही. त्यांचा माजी कर्णधार बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान नावाचा त्यांचा विकेट किपर बॅट्समनला संघातून वगळले आहे फॉर्म हरपल्याने त्यांना संघातून बाहेर वगळण्यात आले आहे. त्यांच्या संघात कर्णधारासह अनेक खेळाडू नवखे आहेत. त्यांचा संघ नवखा असला तरी भारताविरुद्ध ते जीव तोडून खेळतात हा त्यांचा इतिहास आहे. पाकिस्तानी संघात नवीन खेळाडू असले तरी त्या संघास कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नाही. भारताविरुद्ध चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न ते नेहमीच करत असतात. त्यांच्याकडे दर्जेदार वेगवान गोलंदाज आहे. भारतीय फलंदाजांना बाद करण्यासाठी ते जीवाचे रान करतील यात शंका नाही त्यामुळेच हा सामना रंगतदार ठरेल. या स्पर्धेत भारत पाकिस्तान एकदा नव्हे तर तीनदा आमने सामने येतील अशी शक्यता आहे. १४ सप्टेंबर नंतर सुपर फोर मध्येही हे दोन्ही संघ एकमेकांना भिडतील आणि तिथे चांगली कामगिरी केली तर कदाचित अंतिम फेरीतही दोन्ही संघ समोरासमोर येतील. भारत या स्पर्धेतील प्रबळ दावेदार असला तरी टी २० स्पर्धेत कोण विजयी ठरेल हे कोणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही मात्र मागील कामगिरीचा आणि सध्या असलेल्या फॉर्मचा विचार करता भारतच या स्पर्धेत अजिंक्य ठरेल आणि आशिया चषकावर नवव्यांदा नाव कोरेल असा विश्वास १५० कोटी देशवासियांना आहे. आशिया चषकासाठी भारतीय संघाला मनापासून शुभेच्छा!

## चुका..

**एकाद्याचे काढून**
**दुजांस देऊ नका**
**अपराधी बनवती**
**उद्या छोट्या चुका**

**उचितवेळी करावे**
**योग्य आहे जे का**
**परंपरागत ठरवले**
**विश्वास हो पक्का**

**ताटावरून नउठवे**
**डावलूं नये हक्का**
**रक्षणकर्ता कर्तव्य**
**केसा नको धक्का**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

**आप पर भावाचा**
**पुसूनजाई शिक्का**
**इतिहास प्रशिक्षक**
**वेळीचं धडा शिका**

**राजकारणीहातात**
**जाती पाती एक्का**
**आंदोलने उसळता**
**जाम करती चक्का**

**प्रत्येक जण मागतो**
**द्यावामाझाचं टक्का**
**काळजी घेई इतकी**
**रंग न पडेलं फिक्का**

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## ओबीसी आरक्षण बचाव समितीचा साताऱ्यात मोर्चा



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०९, सातारा :** मराठा आरक्षण राज्य सरकारने जाहीर केल्याच्या मुद्द्यावर ओबीसी समाजाचा विरोध वाढला आहे. साताऱ्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याच्या शासनाच्या जीआर विरोधात ओबीसी बचाव समितीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी साताऱ्यात शिवतीर्थ पोवई नाका ते जिल्हाधिकारी कार्यालयावर असा मोर्चा काढण्यात आला. महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष डॉ.बी.के. यादव यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला.

## विदर्भ मराठवाड्यात पाणीटंचाई दूर करण्यासोबतच शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** राज्यातील महत्त्वाकांक्षी वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील पाणीटंचाई दूर करण्यासोबतच शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच आर्थिक नियोजनासाठी केंद्र सरकारकडे निधी मागणीसंदर्भात पत्र पाठवून पाठपुरावा केला जाईल आणि राज्य सरकारकडून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वैनगंगा – नळगंगा नदीजोड प्रकल्पाचे सादरीकरण सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे करण्यात आले. यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. प्रकल्पाची तपासणी राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीमार्फत करून सविस्तर प्रकल्प अहवाल १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत शासनाकडे सादर करावा. तसेच या प्रकल्पाला कालबद्ध नियोजन करून गती द्यावी.



यासाठी केंद्र शासनाकडे पत्र पाठवून, प्रकल्पाच्या किमान २५ टक्के निधी केंद्र सरकारकडून मिळवता येईल का यासाठी राज्य सरकारकडून पाठपुरावा केला जाईल. राज्य शासनाकडूनही आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील गोसीखुर्द ते निम्न वर्धा सर्वेक्षणाचे काम वेळेत पूर्ण झाले आहे. पुढील कामकाजासाठी पर्यावरण मान्यता प्राप्त करून प्रकल्पाचा पहिला टप्पा तात्काळ सुरू करावा, असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## ग्रामपंचायत महासंघाचे साताऱ्यात बेमुदत धरणे आंदोलन

### कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसाठी ग्रामविकास विभागाने पुढाकार घेण्याची अपेक्षा



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०९, सातारा :** ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाने साताऱ्यात त्यांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर धरणे आंदोलन केले. कर्मचाऱ्यांना निर्वाह भत्ता शासकीय तिजोरीतून मिळावा. तसेच महासंघाच्या मागण्यांच्या प्रोसिडिंग ग्रामविकास विभागाने तात्काळ मंजूर करावे. याबाबत ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी बैठकीत या मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्याचे अंमलबजावणी होत नाही. या निषेधार्थ महासंघाने साताऱ्यात धरणे आंदोलन केले. महासंघाचे अध्यक्ष प्राध्यापक तानाजी ठोंबरे, कॉम्रेड मिलिंद गणवीर, सरचिटणीस चव्हाण, संघटक सचिव सखाराम दुर्गडे, ए.बी.कुलकर्णी, मंगेश म्हात्रे, बबन पाटील, सुधीर टोकेकर, उज्वल गांगुर्डे, वसंतराव वाघ, हरिश्चंद्र सोनवणे, अमृत महाजन, शाम चिंचणे, निळकंठ ठोके व राहुल जाधव यांच्यासह महासंघाचे १०० आंदोलक या निषेध आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.

## पितृपक्ष – पितरांना अन्नदान, कावळ्याला नैवेद्य अर्पणाची परंपरा..

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.९, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुका व परिसरात पितृपक्षाला सुरुवात होताच घराघरांत धार्मिक वातावरण दिसून येत आहे. हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र असा हा काळ मानला जातो. श्रावण संपताच भाद्रपदातील पौर्णिमेनंतर पंधरवडाभर हा पितृपक्ष येतो. या काळात प्रत्येक हिंदू कुटुंब आपल्या पितरांना स्मरते, त्यांच्या स्मरणार्थ श्राद्ध विधी, तर्पण, पिंडदान व दानधर्म केला जातो.

पितृपक्षातील प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्त्व मानले जाते. या काळात लोक सकाळी लवकर उठून स्नान करून श्राद्ध विधी करतात. शिजवलेले अन्न प्रथम कावळ्याला अर्पण करण्याची जुनी परंपरा आजही कायम आहे. कावळा हा पितरांचा दूत आहे, अशी श्रद्धा असल्याने घरातील नैवेद्य, पिंड किंवा



तर्पणातील अन्न त्याला अर्पण केले जाते. कावळा ते अन्न स्वीकारतो म्हणजे पितर तृप्त झाले, असे मानले जाते.

गावोगावी पितृपक्षात वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक कुटुंबे गंगा, गोदावरी, नर्मदा अशा पवित्र नद्यांच्या घाटावर जाऊन पिंडदान करतात. काहीजण आपल्या घरीच पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली विधी पार पाडतात. यावेळी ब्राह्मणांना व गरजू गरिबांना भोजन देणे, वस्त्रदान करणे, धान्यदान करणे या दानधर्मालाही मोठे महत्त्व आहे.

धर्मशास्त्रानुसार पितरांचे ऋण फेडण्यासाठी हा काळ अत्यावश्यक मानला गेला आहे. आई–वडील, आजी–आजोबा तसेच पूर्वजांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या स्मरणार्थ कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा पंधरवडा असतो. पितृपक्षात पितरांना प्रसन्न केल्यास घरात समृद्धी, शांती व समाधान नांदते, अशी लोकश्रद्धा आहे.

आजच्या आधुनिक युगात अनेक ठिकाणी या परंपरा साध्या पद्धतीने पार पाडल्या जात असल्या तरीही पितृपक्ष आला म्हणजे कावळ्याला अन्न देणे अनिवार्य आहे ही भावना अजूनही प्रत्येकाच्या मनात दृढ आहे. त्यामुळे पितृपक्षाचा पंधरवडा हा श्रद्धा, भक्ती आणि कृतज्ञतेचा संदेश देणारा काळ ठरतो.

## वाघाच्या हल्ल्यात महिला ठार, आमटे फार्म येथील घटना

### ३ महिन्यातील दुसरी घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, मूल (चंद्रपूर) :** मूल तालुक्यातील वनराईने नटलेल्या सोमनाथ येथील आमटे फार्म येथे तुळशीराम व त्यांची पत्नी अन्नपूर्णा बिलोने हे दाम्पत्य वास्तव्यास आहे. दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ५ च्या सुमारास अन्नपूर्णा ह्या घरामागे भांडे घासत असतांना अचानक वाघाने तिच्यावर हल्ला केला. यावेळी पती तुळशीराम याने प्रतिकार कपण्याचा प्रयत्न केला परंतू वाघाने अन्नपूर्णेच्या नरडीचा घोट घेतल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. तालुक्यातील पर्यटन स्थळ घोषित केलेल्या आणि त्यालाच लागून व्याघ्र प्रकल्पाचा सफारी गेट लावलेल्या जंगलात वाघाचा वावर आहे. याच जंगलाला लागून श्रध्देय बाबा आमटे यांचा फार्म दिव्यांग व कुष्ठरोग वसाहत आहे. गेली अनेक वर्षांपासून शांतीवम वसाहतीमध्ये वयोवृद्ध कुटुंब राहतात. याच वसाहतीमध्ये तुळशीराम व अन्नपूर्णा बिलोने हे दाम्पत्य वास्तव्यास होते.

या घडलेल्या घटनेची माहिती होताच वनविभागाचे क्षेत्र सहाय्यक आर.सी.पेदापल्लीवार यांना माहिती होताच तात्काळ वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना घेऊन घटनास्थळी धाव घेतली. लगेच वनपरिक्षेत्र अधिकारी शेंडे यांनीही लगेच घटनास्थळी धाव घेतली. मोका पंचनामा व चौकशी करुन मृतक महिलेचा शव ताब्यात घेऊन शव विच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय मूल येथे आणण्यात आले. या घटनेत वनरक्षक दुधे, वनमजूर यांनी सहकार्य केले. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी रामचंद्र शेंडे करीत आहे.

वनविभागाने दुर्लक्ष केल्याने या भागात आत्तापर्यंत वाघाच्या हल्ल्यात तीन महिन्यात दोन बळी गेले. यापूर्वी दि.०८ जून २०२५ रोजी याच वस्तीमधील एकावर वाघाने हल्ला करुन ठार केल्याची घटना अजूनही ताजी आहे. याहाबत आमटे फार्म येथील मुख्य संयोजक अरुण कदम यांनी ही वस्ती दिव्यांग आणि कृष्ठरोगी यांची आहे. याला लागूनच जंगल परिसर असून या ठिकाणी वाघाचा वावर आहे. वनविभागाच्या वतीने कृष्ठरोग्यांच्या वसाहतीला सुरक्षेच्या दृष्टीने काहीतरी उपाययोजना करावी यासाठी निवेदनही दिले. परंतु वनविभागाने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे परत दिनांक ०८ सप्टेबर २०२५ रोजी परत वाघाने महिलेवर हल्ला करुन ठार केले. आता तरी वनविभागाने त्वरीत दखल घेऊन वस्तीच्या सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करावी. अशी मागणी प्रकल्प संयोजक अरुण कदम यांनी केली आहे.

## वाहक व प्रवाशांच्या वादात दोन तास एसटी बसस्थानकात थांबून

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०९, मुदखेड (नांदेड) :** नांदेड ते भोकर धावणाऱ्या सर्वसामान्य (ऑर्डनरी) एसटी प्रवासादरम्यान थांबा असूनही प्रवाशास तिकिट न देता वाद घालत तब्बल दोन तास बारड बसस्थानकात प्रवाशांसह एसटी थांबविण्यात आली. या प्रकाराने नाहक मनस्ताप झालेल्या प्रवाशाने वाहकाविरोधात तक्रार केली आहे.

> वाहकाच्या मनमानीमुळे तक्रारदार प्रवाशाची गैरसोय झाली आहे. बारडचे वाहतूक नियंत्रक यांचा जवाब नोंदवून संबंधित वाहकाविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.
>
> **– संजय पुंडगे,**
> **आगार प्रमुख भोकर**

प्रवासी महिला सुरेखा वानोळे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. ५ रोजी भोकर आगाराची सर्वसामान्य (ऑर्डनरी) बस (क्र. एम.एच.१३ सीयु ७२४९) नांदेड ते बारड मार्गे भोकर जाण्यासाठी लागली होती. या मार्गावरील बाबनवाडी येथे बस थांबणार असल्याची खात्री केली व कर्तव्यावरील वाहक शिवनंदा रेणके यांच्याकडे बाबनवाडी थांब्याची तिकट मागीतले असता, सदरील बस बाबनवाडी येथे थांबणार नसल्याचे सांगत पुढील थांबा भोसी किंवा अलिकडचा थांबा बारडचे तिकट घेण्याचा अजब सल्ला दिला.

यावरून वाहक व प्रवाशामध्ये वाद होवून तब्बल दोन तास बस बारड येथील स्थानकात थाबली होती. यामुळे एसटीतील प्रवाशासह बारड स्थानकातील वाहतूक नियंत्रक यांनीही वाहकाची समजून काढण्याची व प्रवाशास बाबनवाडीचे तिकिट देण्याचे सांगितले. दोनतास एसटी थांबल्यानंतर पोलिसांच्या मध्यस्थीने वाहकास बाबनवाडी येथे बस थांबवण्यासाठी सांगण्यात आले ; परंतु यावरही वाहकाने आडमुठे धोरण पत्करल्याने अखेर वानोळे यांना बारड येथे थांबवून सर्व प्रवाशांना पोलिसाच्या मध्यस्थीने भोकर कडे रवाना करण्यात आले. यानंतर वानोळे यांन आगार प्रमुख भोकर व नांदेड येथे संबंधिताकडे गैरसोय झाल्याची व संबंधित वाहकाविरुध्द कारवाई करावी अशी तक्रार दाखल केली आहे.

## निधन वार्ता



मुदखेड तालुक्यातील मौजे महाटी येथील रहिवासी ज्येष्ठ नागरिक महिला कै. मुक्ताबाई राम जी गागलवाड यांचे दि.८ सप्टेंबर रोजी रात्री ९ : ३० वाजताच्या दरम्यान अल्पशा आजाराने वयाच्या ७० व्या वर्षी दुःखद निधन झाले असून त्यांच्या पार्थिव देहावर दि.९ सप्टेंबर रोजी मंगळवारी दुपारी २ वाजता महाटी येथील स्मशानभूमीत अंतिम अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती दोन मुली तिन मुलं नातू पणतू असा मोठा परिवार आहे. पत्रकार साहेबराव गागलवाड यांच्या ते काकू होत.

## पांगरगाव येथे महिला शेती शाळा संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०९ मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील मौजे पांगरगाव येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा–२ अंतर्गत दि.९ सप्टेंबर रोजी महिला शेती शाळा घेण्यात आली.

शेती शाळेत महिला शेतकऱ्यांना सोयाबिन वरील मित्र व शत्रू किडींची ओळख, सोयाबीन वरील प्रमुख किडी व त्यांचे व्यवस्थापन व तसेच सोयाबीन वरील पिवळा मोझॅक विषयी व्यवस्थापन व निंबोळी अर्क तयार करण्याची पद्धत याबाबत माहिती, सहाय्यक कृषि अधिकारी डि.जी.सोनकांबळे यांनी पांगरगाव येथील महिला शेतकऱ्यांना दिली.

# हाताबाहेर जाणारे...उत्सव!



कव्हर स्टोरी

श्री. शिवाजी विठ्ठल चौगुले.

उत्सवांचे मानवी जीवनात विशेष महत्त्व आहे. कारण रोजच्या कामाच्या धबडग्यातून जीवनात आलेला तोच तोच रटाळपणा, कंटाळा, उदासीनता दूर करण्यासाठी थोडी उसंत घेण्याची गरज असते. उत्सवांच्या निमित्ताने ती आपल्याला मिळत असते. नेहमीच्या कंटाळवाण्या जीवनात थोडा काळ उत्साही बदल उत्सव घडवत असतात. उत्सवासाठी आपली नेहमीची कामे बाजूला ठेवून लोक एकत्र येतात. त्यामुळे खेळीमेळीचं वातावरण निर्माण होत असते. पण अलीकडच्या काही वर्षांमध्ये उत्सवांचे स्वरूप बदलत चालले असे म्हणण्यापेक्षा बिघडत चालले आहे, असे म्हणावे लागते. कारण एखाद्या गोष्टीचा अतिरेक झाला की, ते त्रासदायक ठरू लागते. एखादं गाणं तुम्ही ठरविक आवाजात ऐकत असाल तर ते तुम्हाला सुश्राव्य आणि मनाला आनंद देणारं वाटेल. पण त्याचा आवाज प्रचंड प्रमाणात वाढवलात तर त्या आवाजाचा तुमच्या कानाला आणि मनाला त्रास होईल. कुठल्याही प्रकारच्या वाद्यांचीही तिच स्थिती आहे. कुठल्याही वाद्यांचा आवाज मयदित असला तर त्याचा त्रास होणार नाही. पण त्यांच्या आवाजाचा अतिरेक झाला तर लोकांना त्रास होतो. उत्सव मग तो कुठल्याही धर्मियांचा असो ती त्या लोकांची श्रद्धेची आणि भावनिक बाब असते, त्यामुळे तो उत्सव साजरा करताना आणि त्याच्या मिरवणुका काढताना आजूबाजूच्या लोकांना कितीही त्रास झाला तरी ते काही बोलत नाहीत. दुसऱ्यांच्या भावना सांभाळण्याठी तो आवाजाचा अत्याचार सहन करत राहतात.

गणेशोत्सव नुकताच पार पडला. त्यावेळी गणपतीचे आगमन होताना आणि त्याचे विसर्जन करताना काय उत्सवी अतिरेक होतो, त्याचा अनुभव सगळ्यांनी घेतलेला आहे. सार्वजनिक गणेशोत्सव हा काही काल सुरू झालेला नाही, त्याला काही वर्षांचा इतिहास आहे. लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांविरोधात लोकसंघटन करण्याच्या हेतूने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. पण सध्याचे सार्वजनिक गणेशोत्सवाचे आक्रमक आणि आक्रस्ताळी स्वरूप लोकमान्य टिळकांनी पाहिले असते तर हेच काय फळ मम तपाला, असे म्हणून हताश होण्याची वेळ त्यांच्यावर आली असती. फक्त सार्वजनिक नव्हे तर वैयक्तिकरित्या स्थापित केल्या जाणाऱ्या गणपतीच्या मूर्तीचे, त्याच्या आगमनाचे आणि विसर्जनाचे स्वरूप कसे दणदणीत आणि इतरांवर वरचष्मा मिळवणारे असावे यासाठी आटापिटा सुरू असतो. गणपती मंडळांमध्येही सरशी मिळवण्यासाठी स्पर्धा सुरू असते. त्यामुळे मग त्यातून कोण म्हणतो आमचा गणपती नवसाला पावतो, तर काही मंडळे आगमनाची मिरवणूक दणक्यात काढतात, काही विसर्जनाची मिरवणूक दणक्यात काढतात. आपला गणपती हा दुसऱ्यापेक्षा सगळ्याच बाबतीत सरस ठरायला हवा, आपल्याकडे जास्तीत जास्त लोक खेचले गेले पाहिजेत, यासाठी मंडळांचे प्रयत्न सुरू असतात. मुंबई, पुणे आणि राज्याच्या इतर भागातही दरवर्षी गणपती विसर्जनाच्या मिरवणुकांचा कालावधी वाढताना दिसत आहे. आता मिरवणुकांचे स्वरूप हे बेधुंदपणाकडे झुकत आहे. त्यातून मग शिस्त बिघडताना दिसत आहे. यावर्षी खरे तर राज्य सरकारने गणपती मिरवणुकांमध्ये लोकांचे कान फोडून टाकणाऱ्या आणि आवाजाच्या तीव्रतेने हृदयात धडकी भरवणाऱ्या डीजेंवर बंदी घातली होती, पण ते फक्त कागदोपत्री होते, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. लोकांना जो भयंकर त्रास व्हायचा झाला तो झाला.

राज्य सरकारने यावर्षीपासून गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा जाहीर केला आहे. मुद्दा असा आहे की, अगोदरच गणेशोत्सव राज्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो, खरे तर त्याला शिस्त आणण्याची गरज आहे. तसे न करता त्याला अधिक प्रोत्साहन देण्याची सरकारला काय गरज होती. आपल्याकडे लोकशाही शासन प्रणाली आहे. त्यामुळे लोकांच्या मतांवर लोकप्रतिनिधी निवडून येत असतात. त्यांच्या माध्यमातून सरकार बनत असते, पण लोकांना शिस्त लावण्याचे काम हे सरकारचे असते. तसे सरकार करत नाही. उत्सवांना अधिक प्रोत्साहन देऊन लोकांची मर्जी कशी राखता येईल, ज्याचा आगामी निवडणुकीमध्ये आपल्याला कसा उपयोग होईल, असा सगळा प्रयत्न असतो. मुद्दा फक्त गणेशोत्सवाचा नाही. दहीहंडी उत्सवातदेखील तेच झाले. लाखो रुपयांच्या हंड्या बांधून, त्यानिमित्त गर्दी खेचणाऱ्या नृत्यांगनांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. नट, नट्यांना बोलवले जाते. या सगळ्याचा हेतू एकच असतो. गर्दी खेचणे, लोकांना खूश करणे. पण त्या माध्यमातून सामाजिक शिस्त बिघडत चालली आहे, लोकांना त्रास होत आहे, याची सरकारला काही पडलेली नाही. उद्या दिवाळीत फटाक्यांच्या आवाजाचे तसेच होणार आहे. चार दिवस कान फोडून टाकणारे फटाके वाजवले जातील. त्यावर सरकार मर्यादा आणत नाही, कारण त्यांना लोकांना नाराज करायचे नसते. आता सगळ्याच गोष्टींचे जोरदार मार्केटिंग सुरू असते, त्यामुळे या उत्सवाचा फायदा घेऊन अनेक कंपन्या आपल्या उत्पादनांच्या जाहिराती या काळात करून घेतात. मतांसाठी सरकार लोकांचे गुलाम, कायदा सुव्यवस्था ठेवणाऱ्या पोलिसांना सरकारचे ऐकावे लागते, त्यामुळे उत्सावाच्या नावाखाली बेधुंद हंगामा सुरू राहतो. कुठल्याही धर्मियांचे असो, उत्सव आता हाताबाहेर गेलेले आहेत. यावर लिहूनही काही उपयोग होईल, असे वाटत नाही. कारण आपल्याकडील सत्ताधाऱ्यांना सामाजिक शिस्तीपेक्षा पुढची निवडणूक महत्त्वाची वाटत असते.

# ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून ७.४ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

## १६ हजार ७९८ नागरिकांनी केले रक्तदान

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्य सेवेचा लाभ पोहोचला.

राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून २३६ शिबिरांतून एकूण १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.

**२८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ दरम्यान ‘श्री गणेशा आरोग्याचा’ अभियानात : -**

एकूण आरोग्य शिबिरे : १२,६५५

एकूण लाभार्थी रुग्ण : ७,०४,०७३

एकूण पुरुष लाभार्थी : ३,१३,५०८

एकूण महिला लाभार्थी : ३,०५,०३४

लहान बालक लाभार्थी : ८५,५०८

संदर्भित रुग्ण (पुढील उपचारासाठी पाठवलेले) : १८,८००

एकूण रक्तदान शिबिरे : २३६

एकूण रक्तदाते : १६,७९८

महाराष्ट्रातील ७.०४ लाख नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर १६,७९८ दात्यांनी रक्तदान करून समाजासाठी योगदान दिले आहे.

**जिल्हानिहाय सर्वाधिक योगदान**

**सर्वाधिक शिबिरे :-**

पुणे – २५२५

सर्वाधिक रुग्ण तपासणी : पुणे – १,६५,७१८

सर्वाधिक संदर्भित रुग्ण : पुणे – ३,६१३

सर्वाधिक रक्तसंकलन : कोल्हापूर – ४,५०४

बालकांचा सर्वाधिक सहभाग : पुणे – २०,७८१

गणेशोत्सवासारख्या मोठ्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमातून ७.४ लाखांहून अधिक नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करता आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८ हजार ८०० रुग्णांना पुढील मोफत उपचार दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

# सर्वोच्च न्यायालयात शासनाने फेरविचार याचिका दाखल करण्याची शिक्षक परिषदेची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ च्या निकालात इयत्ता १ ते ८ ला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांना अपवाद सेवानिवृत्तीला ५ वर्षे शिल्लक असलेले शिक्षक वगळता अन्य शिक्षकांना टिईटी करणे बंधनकारक केले आहे. अन्यथा २ वर्षांत सेवा संपुष्टात येईल असे म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष प्रकाश चुनारकर यांनी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कायद्याच्या अनुषंगाने शासन आदेश निर्गमित झाल्यापासून टीईटी बंधनकारक करणे आवश्यक होते. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आरटीई कायदा लागू होण्यापूर्वी सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांना सुद्धा टीईटी करणे बंधनकारक केले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाने निवेदनात म्हटले आहे की, शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेऊन सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करून वेळोवेळी निघालेल्या शासन आदेशाचा संदर्भ देऊन शिक्षकांची बाजू मांडून राज्यभरातील लाखो शिक्षकांना दिलासा देण्याची मागणी केली आहे.

टीईटी संदर्भात महाराष्ट्र शासनाने १३ फेब्रुवारी २०१३, ६ मार्च २०१३, २० ऑगस्ट २०१३, १३ डिसेंबर २०१३, ३० जून २०१६, ०७ फेब्रुवारी २०१९ असे विविध शासन आदेश बालकांचा मोफत व सक्तीच्या अधिनियम २००९ पारित झाल्यानंतर काढलेले आहेत. अंजुमन इशात –ऐ–तल्लीम ट्रस्ट विरूद्ध महाराष्ट्र शासन व अन्य अशी याचिका आहे. यामध्ये अनेक सिव्हील अपील आहेत. आता पदोन्नतीसाठी सुद्धा सर्वांना टीईटी बंधनकारक केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे पदाधिकारी सर्वश्री राजेश सुर्वे, संजय पगार, प्रकाश चुनारकर, अमोल देठे, बाबुराव गाडेकर, प्रकाश चतरकर, विजयालक्ष्मी पुरेड्डीवार, भरत मडके, बाबुराव पवार, राजेंद्र नांद्रे, आबा बच्छाव, दिलीप पाटील, सुनिल केणे, राजेंद्र जायभाये, सुखदेव भालेकर, विलास बोबडे, शशिकांत पाटील, वैशाली कुलकर्णी, छाया पाटील, नरेश खडतरे, सुहास लांडे, सचिन गायकवाड, विकास गवते, अनंता गरुड, चंद्रशेखर शिरूरे, सुहास राऊत, प्रकाश काजवे, गणेश नाईक, प्रशांत वाघमारे, राजेश शिंगाडे, शाम लांडे आदींनी सेवेत कार्यरत इयत्ता १ ते ८ ला शिकविणाऱ्या सर्व शिक्षकांना दिलासा देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# डोंबिवली पोलिसांची मोठी कामगिरी - अंतरराज्य चैन स्नॅचिंग टोळीचा पर्दाफाश

**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पोलिसांनी अंतरराज्य चैन स्नॅचिंग करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करून तीन आरोपींना जेरबंद केले आहे. त्यांच्या ताब्यातून सोन्याचे दागिने, गावठी कट्टा, जिवंत काडतुसे आणि चोरीची मोटारसायकल असा एकूण ₹३,८०,४२० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ०३ सप्टेंबर रोजी ठाकुर्ली येथील ९० फुट रोडवरील चामुंडा सोसायटी गेटजवळ वृध्द महिलेकडून चैन स्नॅचिंग प्रकरणाची नोंद डोंबिवली पोलीस ठाण्यात झाली होती. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि अच्युत मुपडे व पोउनि प्रसाद चव्हाण यांच्या पथकाने १०६ सीसीटीव्ही फूटेज तपासून गुन्ह्यातील संशयितांची ओळख पटवली. तपासादरम्यान गुन्ह्यातील मोटारसायकल पुण्यातून चोरीस गेल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, पथकाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार सुनिलनगर, डोंबिवली येथून आरोपींना सापळा रचून ताब्यात घेण्यात आले. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :

१) अभय सुनिल गुप्ता (२१, लखीमपूर खिरी, उत्तरप्रदेश)

२) अभिषेक ओमप्रकाश जौहरी (३२, फतेहपूर, उत्तरप्रदेश)

३) अर्पीत उर्फ प्रशांत अवधेश शुक्ला (२७, लखीमपूर खिरी, उत्तरप्रदेश)

त्यांच्याकडून एक गावठी कट्टा, चार जिवंत काडतुसे, दोन सोन्याचे दागिने व चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. यातील काही मुद्देमाल डोंबिवली व मानपाडा पोलिस ठाण्यातील गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

जप्त मुद्देमाल

गावठी कट्टा (₹३०,०००)

४ जिवंत काडतुसे (₹८,०००)

सोन्याची लगड, ४.१४ ग्रॅम (₹३७,२६०)



सोन्याचे मंगळसूत्र, २३.८९ ग्रॅम (₹२,१५,०१०)

यामाहा एफझेड मोटारसायकल (₹९०,०००)

याशिवाय आरोपींचा इतर गुन्ह्यांमध्ये सहभाग उघड झाला असून त्यांच्यावर पुणे जिल्ह्यातील बिबवेवाडी, हडपसर तसेच उत्तरप्रदेशातील विविध पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे, अर्पीत उर्फ प्रशांत शुक्ला याच्यावर हत्या प्रकरणात कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे समोर आले आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अशितोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे व सहायक पोलीस आयुक्त सुहास हेमांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या यशस्वी कामगिरीत डोंबिवली गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. डोंबिवली पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील चैन स्नॅचिंग प्रकरणांवर आळा बसणार असल्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविणार - मेघना बोर्डीकर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०९, ठाणे :** परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर पहिले सर्वेक्षण पूर्ण केले असून जिल्ह्यातील एकल महिलांचे प्रमाण पाहून राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविणार असल्याचे महिला व बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.

राज्यमंत्री बोर्डीकर यांनी या गंभीर प्रश्नात लक्ष घालून, परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर पहिले सर्वेक्षण पूर्ण केले आहे. नगरपंचायत, नगरपालिका व महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षण लवकरच होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम...**

राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कौशल्यविकास, बचत गटांचे सशक्तीकरण, गृहउद्योग प्रोत्साहन, आरोग्य व निवारा सुविधा यांसारखे कार्यक्रम राबवले जातील. यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सी आर एस भागीदार यांच्यामार्फत एकात्मिक धोरणात्मक कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

तालुका व जिल्हा स्तरावर कृतीगट स्थापन करण्यात येणार ६० वर्षांवरील महिलांसाठी वृद्धापकाळातील योजनांचा अभाव लक्षात घेता त्यांना आरोग्य, सुरक्षितता व उदरनिर्वाहासाठी नवे उपक्रम राबवले जाणार आहेत. उमेद व माविम यांच्या मदतीने स्वयंरोजगार व कौशल्य विकासाचे प्रयत्न वेगाने सुरू करण्यात येणार असून तालुका व जिल्हा स्तरावर कृतीगट स्थापन केले जातील.

राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, एकल महिला हा राज्यातील दुर्लक्षित प्रश्न आहे. या सर्वेक्षणातून त्यांची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दुरवस्था समोर आली आहे. आगामी कृती आराखड्यामुळे या महिलांचे सर्वांगीण सक्षमीकरण होईल आणि महिला सन्मान व सामाजिक समावेश साध्य करता येईल.

परभणी जिल्ह्यातील ग्राम स्तरावरील सर्वेक्षणात निरक्षर व शेतमजुर महिला असून जमिनीचा मालकीहक्क, राहते घर व उत्पन्नाचे साधन यांचा अभाव यामुळे या महिलांना आरोग्य, निवारा, उपजीविका आणि सामाजिक सुरक्षा यांसारख्या मूलभूत सुविधांची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

परभणी जिल्ह्याच्या ग्रामीण भागात ३४ हजार ७३३ एकल महिला असल्याचे अंगणवाडी सेविकांच्या मदतीने झालेल्या सर्वेक्षणातून निदर्शनास आली आहे आहे. या महिलांपैकी विधवा आणि ज्येष्ठ नागरिक आहेत.

# थोडक्यात

## महाबळेश्वरमध्ये ईद-ए-मिलाद उत्साहात साजरा



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर शहरात ईद–ए–मिलाद मिनारा मस्जिद सुन्नत जमात ट्रस्टच्यावतीने उत्साहात साजरा करण्यात आला. हजरत पैगबर मोहंमद यांचा जन्मदिवस ईद–ए मिलाद म्हणून साजरा केला जातो मस्जिद परिसरात पोलीस निरीक्षक बापूसाहेब सांडभोर यांच्या हस्ते तसेच ट्रस्टचे अध्यक्ष रियाज सय्यद यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत नारळ वाढवून जुलूसला प्रारंभ झाला.

मिनारा मस्जिद येथे बापूसाहेब सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. यावेळी व्यासपीठावर पालिकेचे मुख्य लिपिक आबाजी ढोबळे, पो.उ.नि. रूपाली काळे, ज्येष्ठ समाजसेवक तौफिक पटवेकर, मुनीर सय्यद, आसिफ शेख, समीर शेख, अलीअसगर पिंजारी, मौलाना साहब, पत्रकार बांधव आदींसह मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना ज्येष्ठ समाजसेवक तौफिक पटवेकर यांनी जगाला समतेचा, शांततेचा बंधुभावाचा संदेश देणाऱ्या पैगंबर हजरत मोहंमद यांची माहिती दिली गेली. अनेक वर्षापासून ईद ए मिलाद हा अनेकविध उपक्रम राबवून साजरा करण्यात येतो ट्रस्टच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक कार्याची माहिती तौफिकभाई पटवेकर यांनी दिली. दिनांक ५ रोजी ईद–ए मिलाद असताना गणेश विर्सजनाच्या कार्यक्रम असल्याने पोलीस प्रशासनाच्या विनंतीस मान देऊन नुकतेच ईद मिलाद कार्यक्रमाचे आयोजन केले बाबत पोलीस निरक्षक बापूसाहेब सांडभोर यांनी मुस्लिम समाजाचे आभार मानले. मान्यवरांचा व पत्रकार बंधुचा ट्रस्ट च्या वतीने सन्मान करण्यात आला. ईद ए मिलाद चा कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी अध्यक्ष रियाज सय्यद, तौफिक पटवेकर, अलीअसगर पिंजारी, इरफान (हिरो) शेख, समीर शेख, परवेज शेख, अल्ताफ मानकर, सलमान खाटीक, सरफराज शेख, मोहसिन पटवेकर, जाहिद नदाफ, राहिल शेख, सईद पटवेकर इत्यादींनी विशेष मेहनत घेतली.

## विंचूर येथे जय बजरंग मंडळाच्या बाप्पाची मिरवणूक एक आदर्शच

### बजरंग मंडळाचा अवलिया ‘देवा परदेशी’



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील जय बजरंग मंडळ आयोजित गणेश विसर्जन मिरवणूक विसर्जन दिवशी दुपारी ४ वाजता उत्साहात, पारंपरिक व सांस्कृतिक वातावरणात संपन्न झाली. मंडळाने आयोजित केलेली ही मिरवणूक पाहण्यासाठी पंचक्रोशीतील हजारो महिला–पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून वातावरण मंत्रमुग्ध केले.

या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण म्हणजे माऊली दिंडी पथक सोहळा. तब्बल २०० हून अधिक विद्यार्थी पारंपरिक वेशभूषेत व टाळ–चिपळ्यांच्या गजरात सहभागी झाले होते. संत परंपरेची ओळख करून देणारा हा सोहळा उपस्थितांना खऱ्या अर्थाने अध्यात्मिक अनुभूती देणारा ठरला.

त्याशिवाय संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या भिंती चालविण्याचा व रेड्यामुखी वेद बोलविण्याचा देखावा विशेष लक्षवेधी ठरला. हा प्रात्यक्षिक सोहळा पाहून लोकांनी मोठ्या प्रमाणात दाद दिली. याशिवाय श्री स्वामी समर्थ महाराजांच्या लीलांचे सादरीकरण आपले देवा महाराज परदेशी आणि त्यांना साथ दिली चोळापाच्या भूमिकेत आनंदा नागमोते यांनी. त्यांच्या भावपूर्ण व उत्कट सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये श्रद्धेची भावना निर्माण झाली. विविध सांस्कृतिक व धार्मिक देखावे, टाळ–मृदंग, लेझीम, हलगी यांच्या गजरात ही मिरवणूक भव्यतेने पार पडली. मिरवणुकीत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्व वयोगटातील लोकांनी आनंदाने सहभाग नोंदवला. दरम्यान, माऊली दिंडी सोहळ्याचे स्वागत करण्यासाठी मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार नागरिकांनी घराघरासमोर सडा–रांगोळ्या काढून स्वागत केले व मिरवणुकीला उत्साहाची भर घातली.

जय बजरंग मंडळाने केलेल्या उत्तम व्यवस्थापनामुळे ही विसर्जन मिरवणूक शिस्तबद्ध, पारंपरिक व सांस्कृतिक रंगात आणि मुख्य म्हणजे कोणताही कर्कश्य आवाज नाही. अशा प्रकारे साजरी झाली. या मिरवणुकीत सहभागी सर्व मंडळींनी गणपती बाप्पा मोरया च्या गजरात श्री गणेशाची विसर्जन यात्रा मोठ्या भक्तिभावात पार पाडली.

## हभप नारायण महाराज इनामदार यांना राज्यस्तरीय ‘मराठवाडा रत्न’ पुरस्कार घोषित



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०९, पालम (परभणी) :** पुणे येथील मराठवाडा सेवक प्रतिष्ठानच्या वतीने यंदाचा दिला जाणारा राज्यस्तरीय ’ मराठवाडा रत्न २०२५’ पुरस्कार महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवताचार्य तसेच कीर्तनकार, ह भ प नारायण महाराज इनामदार (पालमकर) यांना दिला जाणार आहे.

मराठवाडा सेवक प्रतिष्ठान तर्फे दरवर्षी १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठवाड्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना राज्यस्तरीय ‘मराठवाडा रत्न’ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

या अनुषंगाने बाळकृष्ण महाराज संस्थान, पालम च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक कार्य करणारे महाराष्ट्रातील प्रसिद्ध भागवताचार्य, कीर्तनकार, कथाकार, ह भ प नारायण महाराज इनामदार पालमकर यांना २०२५ चा राज्यस्तरीय ’ मराठवाडा रत्न’ पुरस्कार देऊन त्यांच्या कार्य कर्तुत्वाचा सन्मान केला जाणार आहे.

दिनांक १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड,पुणे येथे विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.पुरस्कार जाहीर होताच नारायण महाराज इनामदार यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे.